CMYK

सुविचार

सुरुवात कुठूनही होऊ शकते, फक्त आपली उंच भरारी घेण्याची इच्छा हवी.

दैनिक
# आरंभ मराठी
www.arambhmarathi.com




■ कोल्हापूर ■ सांगली ■ सातारा ■ सोलापूर ■ धाराशिव ■ लातूर ■ वर्ष 3 रे ■ अंक 26 ■ बुधवार, 15 एप्रिल 2026 ■ पाने 04 ■ किंमत रू.4 ■ epaper.arambhmarathi.com

# जिल्ह्यात कायदा-सुव्यवस्थेची वाट लागली
# एसपी खोखरवर हक्कभंग
## आमदार सुरेश धस यांचा एसपी रितू खोखर यांना इशारा

### अमली पदार्थ प्रकरणातील आरोपींना पाठीशी घातल्याचा गंभीर आरोप

आरंभ मराठी । धाराशिव

**मराठवाड्यातील प्रतिबंधित अंमली पदार्थ (एमडी ड्रग, गांजा) व गुटखा यामुळे तरुण पिढी मोठ्या प्रमाणात बरबाद होत असल्याने अशा प्रकरणी विक्री करणाऱ्या टोळ्यांवर तसेच त्यांच्याशी संगनमत असणाऱ्या संबंधितांवर मकोका अंतर्गत कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करत आमदार सुरेश धस यांनी धाराशिव जिल्हा पोलीस अधीक्षकांना सविस्तर पत्र दिले आहे. मात्र, या संदर्भात वारंवार विनंती करूनही कोणतीही प्रभावी कारवाई करण्यात आलेली नसल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला आहे. आमदार धस यांनी पोलिस अधीक्षक रितू खोकर यांना याप्रकरणी ठोस कारवाई न केल्यास येणाऱ्या पावसाळी अधिवेशनात हक्कभंग प्रस्ताव दाखल करण्याचा इशारा दिला आहे.**

पोलिस अधिकारी रितू खोकर यांना पाठवलेल्या पत्रात त्यांनी नमूद केले आहे की, या विषयी पोलीस महासंचालक तसेच महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री यांना देखील निवेदन देण्यात आले होते. तसेच दिनांक ३ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी पोलीस अधीक्षक रितू खोकर यांच्याशी दूरध्वनीद्वारे सविस्तर चर्चा करून संबंधित आरोपींवर मकोका अंतर्गत कारवाई करण्याची विनंती करण्यात आली होती. महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेल्या अमली पदार्थ व गुटखा तस्करीचा प्रश्न अत्यंत गंभीर सामाजिक स्वरूपाचा असून, यामुळे जनतेच्या आरोग्यावर आणि विशेषतः तरुण पिढीवर गंभीर परिणाम होत असल्याचे धस यांनी पत्रात स्पष्ट केले आहे. नळदुर्ग येथे दिनांक २७ मार्च २०२६ रोजी पोलीस कर्मचारी दत्तात्रय माणिकराव कुंभार व त्यांच्या पथकाने मोठी कारवाई करत तब्बल ४८ लाख ४२ हजार ५०० रुपयांचा गुटखा जप्त केला होता. मात्र या कारवाईनंतर संबंधित आरोपी इंद्रजीतसिंह उर्फ मिटू ठाकूर याने पोलीस कर्मचाऱ्यांना खुलेआम धमकावल्याची बाब समोर आली असून, ती अत्यंत गंभीर असल्याचे धस यांनी नमूद केले आहे.




### आमदार सुरेश धस यांनी पत्रातून या मागण्या केल्या

१) नळदुर्ग प्रकरणातील सर्व आरोपी, तस्कर तसेच त्यांना संरक्षण देणाऱ्या पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांवर मकोका अंतर्गत गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करावी.
२) गुटखा तस्करीप्रकरणी जन्मठेपेच्या शिक्षेची तरतूद करण्यासाठी शासनाकडे शिफारस करावी.
३) आरोपींविरुद्ध तात्काळ नॉन-बेलेबल वॉरंट जारी करावेत.
४) पोलीस बदली धोरण १९५१ च्या कलम २२० व २२N-१ नुसार एकाच ठिकाणी दीर्घकाळ कार्यरत अधिकारी/कर्मचाऱ्यांची तात्काळ बदली करावी.
५) तस्करीस संरक्षण देणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांवर चौकशी करून बडतर्फीची कारवाई करावी.
६) शाळा व महाविद्यालय परिसरातील अमली पदार्थ व गुटखा विक्रेत्यांवर तातडीने कारवाई करावी.

तसेच, आपल्या मतदारसंघातील आरोपी असले तरी त्यांना पाठीशी न घालता त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी असेही त्यांनी त्यावेळी पोलिस अधीक्षक रितू खोकर यांना सांगितले होते. एका प्रमुख आरोपीचे नावही त्यांनी दिले होते. तरीदेखील पोलीस अधीक्षक किंवा त्यांच्या अधिनस्त अधिकाऱ्यांनी कोणतीही तत्परता दाखवली नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली आहे. सद्यस्थितीत मराठवाड्यातील धाराशिव, बीड, जालना, लातूर या जिल्ह्यांमध्ये शाळकरी मुले व तरुणांना अमली पदार्थ व तंबाखूजन्य पदार्थ सहज उपलब्ध होत असून, त्यामुळे तरुण पिढी नशेच्या आहारी जात असल्याचे चित्र आहे. अशा परिस्थितीत पोलीस प्रशासनाने तातडीने कठोर पावले उचलणे आवश्यक असताना कोणतीही प्रभावी कारवाई झालेली दिसत नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे. फोनद्वारे चर्चा करूनही कारवाई होत नसल्याने, लोकप्रतिनिधीने उपस्थित केलेल्या गंभीर मुद्द्यांकडे पोलीस प्रशासन दुर्लक्ष करत असल्याचे दिसून येत असून, संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून अशा प्रकारांना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष पाठिंबा दिला जात असल्याचा गंभीर संशय त्यांनी व्यक्त केला आहे. ही परिस्थिती पूर्णपणे अस्वीकार्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. या सर्व बाबींचा विचार करता, या प्रकरणात तातडीने योग्य कारवाई न झाल्यास आगामी पावसाळी अधिवेशनात पोलीस अधीक्षकांविरुद्ध हक्कभंग प्रस्ताव दाखल करण्यात येईल, असा इशारा आमदार सुरेश धस यांनी दिला आहे.

### जिल्ह्यात गुन्ह्यांचे प्रमाण वाढले

धाराशिव जिल्ह्यात मागील सहा महिन्यांपासून गुन्ह्यांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले असून, गुन्हेगारांवर आळा घालण्यात पोलिस प्रशासनाला अपयश येत असल्याचे चित्र दिसत आहे. जिल्ह्यात घरफोडीच्या दररोज सरासरी चार घटना घडत आहेत. तर दररोज सरासरी तीन मोटारसायकलची चोरी होत आहे. महिला अत्याचारांच्या घटनां देखील वाढल्या असून आठवड्याला दोन महिलांवर अत्याचार होत असल्याचे समोर आले आहे. तीर्थक्षेत्र असलेल्या तुळजापूर शहरात भाविकांना लुटल्याच्या घटना देखील वाढल्याचे दिसत आहे. जिल्ह्यातील प्रमुख बस स्थानकावर महिलांचे दागिने लंपास केल्याची दररोज एक घटना समोर येत आहे. अशा वेळी पोलिसांची जरब दिसून येत नाही. जिल्ह्यात कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर बनत असल्यामुळे पोलिस अधीक्षक रितू खोकर यांच्या कार्यपद्धतीवर आक्षेप घेतले जात आहेत.

## समता, न्याय आणि बंधुत्वाचा संदेश देणारी बाबासाहेबांची जयंती विविध उपक्रमांनी उत्साहात साजरी



आरंभ मराठी । धाराशिव

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त मंगळवारी पुतळ्यास अभिवादन करून अन्नदान कार्यक्रम घेण्यात आला. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व वंचित दुर्बल घटकातील व्यक्तींच्या सर्वांगीण विकासाचे ध्येय साध्य करण्यासाठी राज्य शासनाकडून विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत. या सर्व कल्याणकारी योजनांची माहिती सर्वसामान्य जनतेला व्हावी तसेच जनतेत जनजागृती निर्माण व्हावी या उद्देशाने दरवर्षी ८ एप्रिल ते १४ एप्रिल या कालावधीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह हा कार्यक्रम साजरा करण्यात आला. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच या ठिकाणी समाज कल्याण कार्यालयाकडून अन्नदान स्वरूपात मसाले भात व जिलेबीचे वाटप करण्यात आले. अन्नदान स्टॉलचे उद्घाटन जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंवदा महाडदाळकर,जिल्हा पोलीस अधीक्षक रितू खोखर व जिल्हा परिषदेचे समाज कल्याण समिती सभापती विश्वास कोकणे यांच्या हस्ते करण्यात आले. या अन्नदान वाटप कार्यक्रमास समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त सचिन कवले,समाज कल्याण अधिकारी लामकाने,बहुजन योध्दा संघटनेचे धनंजय शिंगाडे उपस्थित होते.

## धानुरी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी

**लोहारा :-** लोहारा तालुक्यातील धानुरी येथे भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त ग्रामस्थांनी डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. कार्यक्रमाची सुरुवात सरपंच प्रवीण थोरात यांच्या हस्ते पूजन करून करण्यात आली. यावेळी माजी सरपंच गणेश जाधव, ग्रामसेवक शरद बलसुरे, विनोद साळुंके, परमेश्वर साळुंके, श्रीकांत थोरात, राजेंद्र थोरात, तिरुपती वाघमारे, बालाजी मेडे तसेच ग्रामपंचायत कर्मचारी नेताजी लुटे, अशोक भोसले, बालाजी माळी, बालाजी सुरवसे आदी उपस्थित होते. या प्रसंगी उपस्थितांनी डॉ. आंबेडकर यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांचा अंगीकार करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमात मोठ्या संख्येने भीम अनुयायी सहभागी झाले होते.

## तुळजापुरात भाविकांना बोलण्यावरून तरुणावर हल्ला; लोखंडी रॉडने मारहाण

आरंभ मराठी । तुळजापूर

तुळजापूर शहरातील घाटशिळ पार्किंग परिसरात भाविकांना रुम उपलब्ध करून देण्याच्या कारणावरून एका तरुणावर पाच जणांनी सामूहिक हल्ला केल्याची गंभीर घटना घडली. या प्रकरणी तुळजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी सुरज दुशांत रसाळ (वय २५, रा. वेताळ नगर, समाज मंदिराजवळ, तुळजापूर) हे दिनांक ५ एप्रिल २०२६ रोजी रात्री साडेनऊ वाजण्याच्या सुमारास घाटशिळ पार्किंग येथे भाविकांना रुमची सोय करून देण्याबाबत विचारणा करत होते. त्यावेळी आरोपी गणेश कांबळे, साहिल शेख, निलेश अमृतराव, भगवान पारधे व शंकर पारधे (सर्व रा. तुळजापूर) यांनी भाविकांना का बोलतोस असे विचारून वाद घालत फिर्यादीवर हल्ला चढवला. आरोपींनी एकत्र येत जातीवाचक शिवीगाळ केली तसेच लाथाबुक्यांनी व लोखंडी रॉडने मारहाण करून फिर्यादीस गंभीर जखमी केले. याशिवाय जिवे ठार मारण्याची धमकी दिल्याचेही फिर्यादीत नमूद आहे. या प्रकरणी सुरज रसाळ यांनी दिलेल्या तक्रारीवरून तुळजापूर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ११७(२), ३५२, ३५१(३), १८९(२), १९१(२), १९१(३) तसेच अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये कलम ३(१)(आर), ३(१)(एस), ३(२)(व्हिए) अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

## उपळा (मा.) येथील शेतातील मजूराला आत्महत्येस प्रवृत्त केल्याबद्दल मालकावर गुन्हा दाखल
### मृतदेहासह आंदोलन केल्यानंतर पोलिसांची कारवाई

आरंभ मराठी । धाराशिव

धाराशिव तालुक्यातील उपळे (मा.) येथे घडलेल्या एका धक्कादायक घटनेत 23 वर्षीय युवकाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली असून, या प्रकरणी संबंधित आरोपीविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, प्रमोद मनोज अवधुते (वय 23, रा. उपळे (मा.) याने दिनांक 12 एप्रिल 2026 रोजी सकाळी सुमारे 6 वाजण्याच्या सुमारास उपळा शिवारात गळफास घेऊन आत्महत्या केली. या घटनेनंतर मयताच्या कुटुंबीयांनी संशय व्यक्त करत ही आत्महत्या नसून खून असल्याचा आरोप केला. यावेळी संतप्त कुटुंबीयांनी मृतदेह पोलिस अधीक्षक कार्यालयासमोर आणून गोंधळ घातला होता. तसेच आरोपीला तात्काळ अटक करण्याच्या मागणीसाठी काही काळ रस्ता रोको आंदोलनही केले. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी कारवाईचे आश्वासन दिल्यानंतर कुटुंबीयांनी मृतदेह ताब्यात घेऊन अंत्यसंस्कार केले. त्यानंतर मयताचे वडील मनोज नाना अवधुते (वय 47) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी पुढील तपास सुरू केला. फिर्यादीत नमूद केल्याप्रमाणे, आरोपी महेश पडवळ (रा. उपळे मा.) यांनी प्रमोद अवधुते यांना कामावर घेऊन जाण्याच्या बहाण्याने घरी जाऊन जातीवाचक शिवीगाळ केली व मारहाण केली. या सततच्या त्रासाला कंटाळून प्रमोद यांनी आत्महत्या केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी आनंदनगर पोलीस ठाण्यात भा.न्या.सं. कलम 108, 115(2), 352 तसेच अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम कलम 3(1)(आर), 3(1)(एस) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## बनावट पोलिसांकडून वृद्ध दाम्पत्याची फसवणूक
### ६० हजारांचे सोन्याचे गंठन लंपास

आरंभ मराठी । तुळजापूर

तुळजापूर शहरात पुन्हा एकदा बनावट पोलिसांच्या नावाखाली फसवणुकीचा प्रकार उघडकीस आला असून, यामध्ये एका वृद्ध दाम्पत्याला लक्ष्य करण्यात आले आहे.तुळजापूर तालुक्यातील मंगरुळ येथील रहिवासी उन्नती भामंडळ मेहता (वय ७२ वर्षे) व त्यांचे पती १२ एप्रिल २०२६ रोजी दुपारी सव्वातीन वाजण्याच्या सुमारास मंगरुळहून जात असताना सैनिक स्कूलच्या पुढे रस्त्यावर दोन अनोळखी इसमांनी त्यांना अडवले. संबंधित इसमांनी स्वतःला पोलीस असल्याचे भासवून तुळजापूर शहरात चोऱ्या वाढल्याचे सांगत विश्वास संपादन केला. यानंतर त्यांनी मेहता यांना त्यांच्या गळ्यातील अंदाजे दोन तोळे वजनाचे सोन्याचे मिनी गंठन (किंमत सुमारे ६० हजार रुपये) सुरक्षित ठेवण्यासाठी पर्समध्ये ठेवण्याचा सल्ला दिला. मात्र, हा प्रकार फसवणुकीचा असल्याचे न समजल्याने मेहता यांनी गंठन काढून दिल्यानंतर आरोपींनी ते पर्समध्ये ठेवण्याचा बहाणा करून स्वतःजवळच ठेवले आणि तिथून पसार झाले. घडलेला प्रकार लक्षात आल्यानंतर उन्नती मेहता यांनी तुळजापूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार पोलीसांनी भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४), ३(५) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

## ओम घायतिडक यांचे यश



**धाराशिव-** तालुक्यातील खानापूर येथील सर्वसाधारण शेतकरी कुटुंबातील मुलगा ओम प्रकाश घायतिडक याला रायगड-अलिबाग येथील पोलिस परिक्षेत यश मिळाले.23 वर्षाच्या ओमने जनरल SEBC श्रेणीतून ग्राऊंडवर 39 व लेखी परीक्षेत 94 असे एकूण 150 पैकी 133 गुण प्राप्त केले.धाराशिव येथील श्री करिअर अकॅडमीचे संचालक श्री.मिथीलेश दिक्षीत यांच्या मार्गदर्शनाखाली त्याला हे यश मिळाले असून तो यासाठी मागील तीन वर्षांपासून कठोर परिश्रम घेत होता.ओम याने मेहनत, जिद्द, चिकाटीच्या जोरावर पोलीस दलात यश मिळवले त्याबद्दल त्याचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन होत आहे.तसेच खानापूर ग्रामस्थ, मित्र परिवार, नातेवाईक यांनी ओम ,व त्याचे आई-वडिल,गुरुवर्य दिक्षीत सरांचा सत्कार केला.

# वादग्रस्त असलेले चोराखळी येथील महाकाली लोकनाट्य कलाकेंद्र प्रशासनाकडून सील

आरंभ मराठी । धाराशिव

कळंब तालुक्यातील मौजे चोराखळी येथील महाकाली सांस्कृतिक लोकनाट्य कला केंद्र अखेर महसूल व पोलिस प्रशासनाने संयुक्त कारवाई करत मंगळवारी (दि. १४) सकाळी सील केले. संबंधित केंद्र बेकायदेशीरपणे सुरू असल्याचे तसेच न्यायालयीन व प्रशासकीय आदेशांचे उल्लंघन झाल्यामुळे ही कारवाई करण्यात आल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, राजाभाऊ सिताराम माळी (रा. चोराखळी, ता. कळंब) यांनी या कला केंद्रास परवानगी मिळण्यासाठी अर्ज केला होता. मात्र संबंधित विभागांकडून आलेल्या अहवालांच्या आधारे दिनांक ७ फेब्रुवारी २०२३ रोजीचा अर्ज तहसील कार्यालयाने नामंजूर केला होता. याबाबत अधिकृत पत्राद्वारे माळी यांना पूर्वीच कळविण्यात आले होते. दरम्यान, या निर्णयाविरोधात माळी यांनी मुंबई उच्च न्यायालय येथे २०२४ मध्ये रिट याचिका दाखल केली होती. या याचिकेवर दिनांक २४ मे २०२४ रोजी न्यायालयाने काही अटींसह आदेश दिले होते. मात्र नंतर संबंधित अर्ज नामंजूर झाल्याने आणि अंतिम निर्णय येईपर्यंत केंद्र बंद ठेवण्याबाबत प्रशासनाने स्पष्ट सूचना दिल्या होत्या. तरीही आदेशांचे उल्लंघन करत कला केंद्र सुरूच ठेवण्यात आले. याशिवाय, या केंद्राशी संबंधित काही गुन्हे नोंद झाल्यामुळे भविष्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता पोलीस प्रशासनाने व्यक्त केली होती. पोलीस अधीक्षकांनी केंद्र कायमस्वरूपी बंद ठेवण्याची शिफारस केली होती. उपविभागीय दंडाधिकारी, कळंब यांनीही केंद्राची तपासणी करून नियमांचे उल्लंघन होत असल्याचा अहवाल सादर केला होता. त्यामुळे प्रशासनाने पुन्हा एकदा केंद्र बंद ठेवण्याचे आदेश दिले होते. मात्र त्यानंतरही केंद्र सुरूच ठेवण्यात आल्याचे निदर्शनास आले. दरम्यान, या प्रकरणी दिनांक ९ एप्रिल २०२६ रोजी उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने पुढील आदेश दिल्यानंतर प्रशासनाने कठोर भूमिका घेत कारवाईचा निर्णय घेतला. त्यानुसार मंगळवारी महसूल व पोलिस विभागाने संयुक्तपणे कारवाई करून संबंधित कला केंद्र सील केले. जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी स्पष्ट इशारा देत, अनधिकृत व बेकायदेशीररित्या कोणतीही आस्थापना सुरू ठेवू नये. अन्यथा संबंधितांवर नियमानुसार कडक कारवाई करण्यात येईल, असे सांगितले. मागील काही दिवसांपासून धाराशिव जिल्ह्यातील कलाकेंद्रावर गुन्हेगारी स्वरूपाच्या गंभीर घटना घडत असल्यामुळे कलाकेंद्र वादाच्या भोवऱ्यात सापडले होते. मात्र, प्रशासनाकडून आता यावर धडक कारवाई करण्यात आली आहे.







CMYK

# अवकाळी पावसाचा फटका; तरीही कैऱ्यांची बाजारात आवक वाढली

## मोहोर गळाल्याने उत्पादन घटण्याची शक्यता; उरलेल्या कैऱ्यांमुळे शेतकऱ्यांना दिलासा

बालाजी मुळे । आरंभ मराठी

मुरूड - यंदाच्या हंगामात आंब्याच्या झाडांना मोठ्या प्रमाणात मोहोर आला होता. सुरुवातीला हवामान अनुकूल असल्यामुळे आंबा उत्पादक शेतकऱ्यांमध्ये मोठ्या उत्पादनाची आशा निर्माण झाली होती. अनेक ठिकाणी झाडे मोहोराने भरून गेली होती, त्यामुळे यंदा विक्रमी उत्पादन होईल, अशी शक्यता वर्तविण्यात येत होती. मात्र, मध्यंतरी झालेल्या अवकाळी पावसामुळे आणि जोरदार वाऱ्यांमुळे परिस्थिती अचानक बदलली. सुसाट वाऱ्यांमुळे झाडांवरील नाजूक मोहोर आणि लहान लहान कैऱ्या मोठ्या प्रमाणात गळून पडल्या. काही ठिकाणी तर 30 ते 40 टक्क्यांपर्यंत नुकसान झाल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसला असून उत्पादन घटण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

तरीदेखील, सर्व झाडांचे नुकसान झालेले नसून काही प्रमाणात मोहोर आणि कैऱ्या झाडांवर टिकून राहिल्या आहेत. या कैऱ्यांची वाढ आता चांगल्या प्रकारे होत असून त्या मोठ्या आकाराच्या झाल्या आहेत. हवामान पुढील काळात अनुकूल राहिल्यास या कैऱ्या पिकून गोड आंब्यांमध्ये रूपांतरित होतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. त्यामुळे पूर्ण नुकसान टळून काही प्रमाणात उत्पादन मिळेल, असा शेतकऱ्यांना दिलासा मिळत आहे. सध्या स्थानिक बाजारपेठेत कैऱ्यांची आवक हळूहळू वाढू लागली आहे. व्यापारी व विक्रेते विविध भागांतून कैऱ्या आणून विक्री करत आहेत. उन्हाळ्याच्या प्रारंभीच कैऱ्यांना चांगली मागणी मिळत असून किंमतीही स्थिर आहेत. कैरीपासून बनवले जाणारे विविध पदार्थ जसे की पन्हे, लोणचे, चटणी, किसलेली कैरी, कच्च्या कैरीचे काप यांना ग्राहकांकडून मोठी पसंती मिळत आहे. विशेषतः ग्रामीण भागात घरगुती लोणचे तयार करण्यासाठी कैऱ्यांची मोठ्या प्रमाणात खरेदी होत आहे. तसेच शहरांमध्येही कैरीपासून बनवलेले थंड पेय पन्हे याला मोठी मागणी आहे.





### कैरीचे आरोग्यदायी फायदे

कैरी ही केवळ चविष्ट नसून आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त आहे. उन्हाळ्यात शरीराला थंडावा देणारे आणि पोषण देणारे फळ म्हणून तिचे विशेष महत्त्व आहे.

### रोगप्रतिकारक शक्ती वाढवते

कैरीमध्ये व्हिटॅमिन C आणि अँटीऑक्सिडंट्स मोठ्या प्रमाणात असतात, जे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढवतात.

### डिहायड्रेशन टाळते

उन्हाळ्यात होणारा पाण्याचा तुटवडा भरून काढण्यास कैरी उपयुक्त ठरते.

### उष्माघातापासून संरक्षण

कैरीपासून तयार केलेले पन्हे शरीरातील उष्णता कमी करून उष्माघातापासून संरक्षण करते.

### पचनक्रिया सुधारते

कैरी पचन सुधारण्यास मदत करते तसेच भूक वाढवते.

### त्वचा आणि केसांसाठी फायदेशीर

कैरीतील पोषकतत्त्वे त्वचा तजेलदार ठेवतात व केसांना पोषण देतात.


### ऊर्जा प्रदान करते

कैरीमधील नैसर्गिक साखर शरीराला ऊर्जा देते आणि थकवा कमी करते.

# उष्णतेचा धोका वाढला; उष्माघातापासून बालकांचे संरक्षण करा

## डॉ. दिग्गज दापके देशमुख यांचे पालकांना आवाहन

आरंभ मराठी । धाराशिव



जिल्ह्यात सध्या तीव्र उन्हाळ्याची लाट सुरू असून तापमानात मोठी वाढ झाली आहे. या पार्श्वभूमीवर प्रख्यात बालरोग तज्ञ डॉ. दिग्गज दापके देशमुख यांनी पालकांना लहान बालकांची विशेष काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. उन्हाळ्यात वाढलेल्या तापमानाचा सर्वाधिक परिणाम लहान मुलांवर होत असून त्यांच्या शरीरातील पाण्याचे प्रमाण झपाट्याने कमी होण्याचा धोका असतो. यामुळे डिहायड्रेशन, उष्माघात, ताप, उलट्या आणि अशक्तपणा यांसारख्या गंभीर समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे पालकांनी सतर्क राहणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. डॉ. देशमुख यांनी सांगितले की, लहान बाळांची उष्णता सहन करण्याची क्षमता कमी असल्यामुळे त्यांना थेट उन्हात नेणे टाळावे. विशेषतः सकाळी ११ ते दुपारी ४ या वेळेत बाहेर जाणे टाळणे गरजेचे आहे. घरात थंड आणि हवेशीर वातावरण ठेवून बाळांना आरामदायी स्थितीत ठेवावे. आहाराबाबतही त्यांनी महत्त्वाच्या सूचना दिल्या. नवजात बाळांसाठी आईचे दूध हेच सर्वोत्तम असल्याने स्तनपान नियमित ठेवावे. मोठ्या मुलांच्या आहारात द्रव पदार्थांचे प्रमाण वाढवून लिंबूपाणी, ताक, नारळपाणी आणि ताज्या फळांचे रस द्यावेत. टरबूज, खरबूज, काकडी यांसारख्या पाण्याचे प्रमाण जास्त असलेली फळे आहारात समाविष्ट करावीत. जड, तळलेले व तेलकट पदार्थ टाळून हलके व पचायला सोपे अन्न द्यावे. बालकांमध्ये काही धोक्याची लक्षणे दिसल्यास त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्यावा, असेही त्यांनी सांगितले. बाळ सुस्त होणे, सतत रडणे, उलट्या होणे, ताप येणे, लघवी कमी होणे किंवा त्वचा कोरडी पडणे ही लक्षणे गंभीर ठरू शकतात. उन्हाळ्यातील थोडेसे दुर्लक्षही बालकांसाठी धोकादायक ठरू शकते. त्यामुळे पालकांनी सतर्क राहून बाळांना पुरेसे पाणी, योग्य आहार आणि सुरक्षित वातावरण देणे आवश्यक आहे, असे डॉ. देशमुख यांनी सांगितले.

# संभाजी ब्रिगेडच्या जिल्हा संघटकपदी निलेश साळुंके यांची निवड

आरंभ मराठी । धाराशिव



संभाजी ब्रिगेडच्या जिल्हा संघटकपदी निलेश उर्फ गणेश साळुंके यांची निवड करण्यात आली असून, या निवडीबद्दल साळुंके यांचे अभिनंदन होत आहे. संभाजी ब्रिगेडच्या (पक्ष) जिल्हा कार्यकारिणीची महत्त्वपूर्ण बैठक जिल्हाध्यक्ष शिवश्री आकाश मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत संघटनात्मक बांधणीवर भर देत विविध नियुक्त्यांची घोषणा करण्यात आली. यावेळी शिवश्री निलेश पार्वती राम साळुंके यांची संभाजी ब्रिगेडच्या जिल्हा संघटकपदी नियुक्ती करण्यात आली. या नियुक्तीमुळे जिल्ह्यातील संघटन अधिक बळकट होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.बैठकीस संभाजी ब्रिगेडचे जिल्हा उपाध्यक्ष शिवश्री बाळासाहेब गाडेकर, जिल्हा सचिव शिवश्री आदित्य देशमुख, जिल्हा संघटक शिवश्री शाहनवाज सय्यद, शिवश्री गणेश साळुंखे, शहराध्यक्ष शिवश्री शुभम चव्हाण, शहर कार्याध्यक्ष शिवश्री पवन आवटे, शहर संघटक शिवश्री अमर घोडके, तालुका उपाध्यक्ष शिवश्री बाळासाहेब शिंदे, तालुका कार्याध्यक्ष शिवश्री संतोष लाकाळ यांच्यासह प्रजय पवार, नितीन मुंडे, गोविंद पाटील, आकाश सहाणे, रवी चव्हाण, अमोल पाटील, खंडू प्रकाश कसबे, श्रावण मुरलीधर धावारे आदी पदाधिकारी उपस्थित होते.तसेच मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष शिवश्री सतीश पाटील, जिल्हा कार्याध्यक्ष शिवश्री विजयकुमार पवार आणि शहराध्यक्ष शिवश्री महेश इंगळे यांनीही बैठकीस उपस्थित राहून मार्गदर्शन केले.

# तेर येथे खासदार ओमराजे निंबाळकर यांच्याकडून महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन

आरंभ मराठी । तेर



भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त धाराशिव तालुक्यातील तेर येथे अभिवादनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. तेर येथील अण्णाभाऊ साठे चौकात धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर यांनी बाबासाहेबांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले. यावेळी तालुका शिवसेना प्रमुख सतीशकुमार सोमाणी, आदित्य जिवनराव गोरे, माजी सरपंच महादेव खटावकर, ग्रामपंचायत सदस्य अविनाश आगाशे, अमोल कसबे, नामदेव कांबळे, लखन रसाळ आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी कानिफनाथ देवकुळे, राम तेरकर, पांडुरंग बागडे, रंगनाथ लोमटे, शशिकांत सोनवणे, विनोद कांबळे, सुनील कांबळे, अजय कांबळे, आदित्य शिंदे, सुनील गायकवाड, नारायण साळुंखे, बिभीषण लोमटे, अर्शाद मुलाणी, सुधाकर फासे, सचिन देवकते, रमाकांत लकडे, पांडुरंग माळी, हिजू काजी, राम शिंदे, महादेव सोनवणे, काका राऊत, सुरेश पौळ, संतोष देवकुळे, कृष्णा भोंडे, शुभम शिंदे, सूरज खंडागळे आदी उपस्थितांनीही महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले.

# धाराशिवमध्ये भीमजयंती उत्साहात

## महामानवाला अभिवादन करण्यासाठी उसळला जनसागर

आरंभ मराठी । धाराशिव



भारतीय घटनेचे शिल्पकार, महामानव विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त धाराशिव शहरात उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी दिवसभर आंबेडकर चौक परिसरात अलोट जनसागर उसळला होता. काल सकाळपासूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी विविध राजकीय नेते, प्रशासकीय अधिकारी तसेच सर्व स्तरातील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. शहरातील विविध सामाजिक संघटनांनी भीमजयंतीनिमित्त समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करून जयंतीला सामाजिक बांधिलकीची जोड दिली. या निमित्ताने काही ठिकाणी संविधानाच्या उद्देशिकेचे वाटप करण्यात आले, तर अनेक ठिकाणी रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. तसेच आंबेडकर चौक परिसरात नागरिकांसाठी अल्पोपहार आणि पिण्याच्या पाण्याचीही उत्तम व्यवस्था करण्यात आली होती. यावेळी जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, पोलीस अधीक्षक रितू खोकर, जिल्हा परिषद सीईओ प्रियवदा महाडदाळकर, आमदार कैलास पाटील, भाजपचे युवा नेते मल्हार पाटील यांच्यासह अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून बाबासाहेबांना अभिवादन केले. सायंकाळी शहरातून विविध भागांतून भव्य मिरवणुका काढण्यात आल्या. भीमगीतांच्या गजरात आणि ढोल-ताशांच्या तालावर तरुणाईने उत्स्फूर्त सहभाग नोंदवत वातावरण भारावून टाकले. संपूर्ण शहर निळ्या झेंड्यांनी आणि रोषणाईने सजले होते. शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक एकात्मता, उत्साह आणि आदरभाव यांचे दर्शन घडले.

# तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची १३५ वी जयंती उत्साहात साजरी

**धाराशिव** :- तेरणा पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट संचलित कॉलेज ऑफ इंजीनियरिंग येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्य डॉ. विक्रम सिंह माने यांच्या हस्ते डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहून करण्यात आली. यावेळी प्राचार्य डॉ. विक्रम सिंह माने यांनी आपल्या मनोगतात डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या माध्यमातून सर्वांगीण विकास साधण्याचे तसेच समानता, बंधुता आणि सामाजिक न्याय या मूल्यांचा अंगीकार करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी एनएसएस समन्वयक प्रा. डी. डी. मुंडे यांनी विशेष परिश्रम घेतले. या प्रसंगी डीन अकॅडमी व मेकॅनिकल विभाग प्रमुख डॉ. डी. डी. दाते, बीएसएच विभाग प्रमुख डॉ. उषा वडणे, सिव्हिल विभाग प्रमुख प्रा. शीतल पवार, हॉस्टेल समन्वयक प्रा. आर. डी. गुरव, एनएसएस समन्वयक प्रा. डी. डी. मुंडे, डीन स्टुडंट्स वेल्फेअर डॉ. राजश्री यादव, प्रा. संदीप नलगे, प्रा. वर्षा पाटील, प्रा. ऐश्वर्या सक्राते, श्री. रामेश्वर मुंडे, श्री. एस. एन. नेपते व पी. पी. वाघमोडे आदी मान्यवर उपस्थित होते.

## कार्यालय
## जिल्हा वक्फ अधिकारी, धाराशिव

मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, हॉल क्र ९२ (सेंट्रल विल्डींग), धाराशिव

संचिका क्र. ६९/४४८/२०२३ — क्र. वक्फ-जिवअ/चौकशी-1634 /२०२६.

(जाहीर प्रगटन) — दिनांक:- 06 APR 2026

**उम्मीद अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अन्वये वक्फ संस्थेच्या योग्य प्रशासनाकरीता योजना मंजूर करणेबाबत.**

**वक्फ संस्थेच नाव व पत्ता:- वक्फ संस्था मस्जिद तोरण बावली, आशुरखाना मंडई मोहल्ला मौजे, परंडा ता. परंडा जि. धाराशिव**

उपरोक्त वक्फ संस्था महाराष्ट्र राज्य यक्फ मंडळात नोंदणीकृत असुन अर्जदार श्री. आवेज सादिक शेख तोरणवाले यांनी दिनांक. १९.०६.२०२३ रोजीच्या अर्जान्वये सदर संस्थेच्या व्यवस्थापनाकरीता महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळा/ जिल्हा वक्फ अधिकारी धाराशिव कडे प्रारुप योजना दाखल केलेली आहे. प्रारुप योजनेतील तरतूदीनुसार विश्वस्तांचा कार्यकाळ ५ (पाच) वर्षाचा असून व्यवस्थापन समिती निवडीची रित उर्वरित विश्वस्त नविन विशवस्तांची नेमणुक करतील अशी आहे. योजनेमध्ये नमूद प्रस्तावित व्यवस्थापन समिती खालीलप्रमाणे आहे:-

| अ. क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| 1 | आवेज सादिक शेख तोरणवाले | अध्यक्ष |
| 2 | हुसेन इस्माईल शेख | उपाध्यक्ष |
| 3 | गुलामगीरा सिकदर पठाण | सचिव |
| 4 | अनदर अ. करीम शेख | सहसचिव |
| 5 | शेख हारुन खेरुद्दीन | सदस्य |
| 6 | निहाल हारुन शेख | सदस्य |
| 7 | मलिक अंगीर मंदारी | सदस्य |
| 8 | मुसा अब्दुल करीम शेख | सदस्य |
| 9 | चांदपाशा चौरुद्दीन शेख | सदस्य |
| 10 | मुस्तफा हुसेन मदारी | सदस्य |
| 11 | राभीर गौस शेख | |

सदर प्रारुप योजनेबाबत काही तक्रारी, आक्षेप असल्यास संबंधितांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसाच्या आत, जिल्हा वक्फ अधिकारी, मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, दुसरा मजला, हॉल क्र ९२ (सेंट्रल बिल्डींग) धाराशिव येथे आपले म्हणणे दाखल करावे, विहीत वेळेनंतर आक्षेप प्राप्त झाल्यास त्याची दखल घेण्यात येणार नाही. याची दक्षता घ्यावी.

(सय्यद आमेर)
जिल्हा वक्फ अधिकारी
धाराशिव

प्रत,
१. दैनिक लोकमत / लोकमत समाचार / सकाळ / भास्कर / पुण्यानगरी/ लोकसत्ता / महाराष्ट्र टाईम्स/नवभारत / उर्दू टाईम्स/दैनिक संघर्ष
किंवा इतर कोणतेही दैनिक (शासन यादीतील).
२. नोटीस बोर्ड, पक्फ संस्था मस्जिद तोरण बावली आशुरखाना मंडई मोहल्ला मौजे, परंडा ता. परंडा जि. धाराशिव,
३. अर्जदार श्री. आवेज सादिक शेख तोरणवाले रा. परंडा ता. परंडा जि. धाराशिव यांनी पाठविलेल्या प्रस्तापीत योजना अर्ज दिनांक १९.०६.२०२३ रोजीच्या अनुषंगाने त्यांना आदेशीत करण्यात येते कि, या योजने बाबतचे जाहीर प्रकटन स्थानिक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करावे व त्याची एक प्रत वक्फ संस्थेच्या सुचनाफलकावर डकयुन त्याचा रितसर पंचनामा करावा व आक्षेपाची मुदत संपल्यानंतर वृत्तपत्राच्या दोन प्रती व पंचनाम्याचे दस्तएवज या कार्यालयात सादर करावेत. सदर जाहीर प्रकटन वृत्तपत्रात प्रसिध्द करण्याचा खर्च अर्जदाराने स्वतः करावयाचा आहे. महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ किया जिल्हा वक्फ अधिकारी धाराशिव कडुन यासाठी कोणताही खर्च केला जाणार नाही.

आरंभ मराठी — कलाकारांच्या अदाकारीने जिंकली मने

# साहेब महोत्सव 2026 : राज्यस्तरीय नृत्य स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

आरंभ मराठी । धाराशिव




ग्रामीण भागातही दर्जेदार सांस्कृतिक कार्यक्रमांची उभारणी होत असल्याचे ठळक उदाहरण 'साहेब महोत्सव २०२६' अंतर्गत पार पडलेल्या राज्यस्तरीय नृत्य स्पर्धेत पाहायला मिळाले. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या कलाकारांनी आपल्या अप्रतिम सादरीकरणातून उपस्थितांची मने जिंकत स्पर्धेला रंगत आणली. या स्पर्धेबद्दल गौरवोद्गार काढताना माजी मंत्री, आमदार डॉ. तानाजीराव सावंत यांनी आयोजकांचे विशेष कौतुक केले. ग्रामीण भागात अशा दर्जेदार स्पर्धेचे आयोजन करून स्थानिक कलाकारांना हक्काचे व्यासपीठ मिळवून दिले, ही कौतुकास्पद बाब आहे, असे ते म्हणाले. तसेच कार्यक्रमाला उपस्थित राहून कलाकारांचा उत्साह वाढवताना मनाला समाधान मिळाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.भूम तालुक्यातील ईट येथे प्रवीण देशमुख यांच्या पुढाकारातून ही भव्य स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. आपल्या मातीतली कला जपली गेली पाहिजे आणि ती पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचली पाहिजे, यासाठी आमचा कायम प्रयत्न राहील, असे आमदार डॉ. सावंत यांनी स्पष्ट केले.यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख दत्ता साळुंके, संजय गाढवे, अण्णासाहेब देशमुख, बाळासाहेब पाटील हंडोग्रीकर, केशव सावंत, नगराध्यक्ष जाकीर सौदागर, जिल्हा परिषद सदस्य विकी चव्हाण, अमर मोरे, राहुल डोके, सुनिल उंद्रे, बालाजी काळे, भाऊसाहेब मारकड, महिला आघाडी जिल्हाप्रमुख अर्चनाताई दराडे, युवा सेना जिल्हा प्रमुख बाळासाहेब मांगले यांच्यासह शिवसेना पक्षाचे पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.स्पर्धेला राज्यभरातून स्पर्धक उपस्थित होते.

हे पत्र मालक, मुद्रक, संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी,गवळी वाडा धाराशिव, ता. जि. धाराशिव, येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव)
संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८० RNI NO.-2023/90078 कार्यालय; सुकर्मा कॅपिटल, बार्शी नाका, जिजाऊ चौक, धाराशिव-४१३५०१.मो. ९४२२०६८४२२. This letter was published by owner, printer, editor Chandrasen Govindrao Deshmukh, printed at Aadesh Printers, Ramkrishna Colony, Gawli Wada Dharashiv, Ta. Dist. Dharashiv, and published at Ramkrishna Colony, Gawli Wada, Dharashiv (Maharashtra).
पुणे कार्यालयः1012,विंग B, पूर्वांचल,वेबग्योर स्कुलशेजारी, वाघोली,पुणे.

## विविध वृत्त

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी



**आरंभ मराठी । धाराशिव**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त डॉ. पद्मसिंह पाटील विद्यामंदिर, भागीरथीबाई लाटे हायस्कूल आणि संस्कार प्री-प्रायमरी इंग्लिश स्कूल, धाराशिव येथे विविध उपक्रमांनी भीम जयंतीचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष अमित लाटे यांनी बाबासाहेबांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले. त्यानंतर त्यांच्या महान कार्याचा गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांनी निबंध व वक्तृत्व स्पर्धांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवत जयंतीचा आनंद द्विगुणित केला. कार्यक्रमाला शाळेतील पालक व परिसरातील नागरिक उपस्थित होते. सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मोलाचे सहकार्य केले. मुख्याध्यापक अमर केवळराम आणि अलका जाधवर यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले.

### सह्याद्री पोदार लर्न स्कूलमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी



**आरंभ मराठी । मुरूड**

सह्याद्री पोदार लर्न स्कूलमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी डॉ. आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित विविध कलाविष्कार सादर करत त्यांच्या कार्याचा गौरव केला. भाषण, नाटिका, गीत आदी माध्यमांतून विद्यार्थ्यांनी त्यांच्या विचारांची प्रभावी मांडणी केली. कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष आदित्य पाटील, सचिव श्रुती पाटील, प्राचार्य विराज माकणीकर यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच शाळेतील सर्व शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना डॉ. आंबेडकर यांच्या विचारांची प्रेरणा मिळाली असून सामाजिक समतेचा संदेश देण्यात आला.

### सह्याद्री इंटरनॅशनल स्कूलमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

**आरंभ मराठी । धाराशिव**

सह्याद्री इंटरनॅशनल स्कूल येथे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका आशा इंगळे यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. तसेच उपस्थित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी बाबासाहेबांना अभिवादन करून त्यांच्या महान कार्यास आदरांजली वाहिली. कार्यक्रमादरम्यान भारतीय संविधानाच्या प्रस्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये संविधानाबद्दल जागरूकता निर्माण करण्याचा संदेश देण्यात आला. या कार्यक्रमास शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### राजर्षी शाहू संस्थेकडून दिव्यांग बांधवांना फळाचे आणि पाण्याचे वाटप



**धाराशिव** :- समता, न्याय आणि मानवमूल्यांची शिकवण देणारे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त दिव्यांग बांधवांप्रती संवेदनशीलता जपत राजर्षी शाहू बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने फळे व पाण्याचे वाटप करण्यात आले. फुले-शाहू-आंबेडकर उद्यान कृती समितीच्या वतीने आयोजित महामानव महा जयंती महोत्सवात शासकीय योजनांची माहिती, दिव्यांग बांधवांसाठी विशेष मेळावा तसेच आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी राजर्षी शाहू संस्थेने दिव्यांग बांधवांसाठी फळे व पाण्याचे वाटप करून समाजसेवेचा संदेश दिला. कार्यक्रमास संस्थेचे सचिव रमेश पाटील, उपाध्यक्ष वनिता शिंदे, सदस्य ज्योती राजे निंबाळकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

### के.टी. पाटील औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयात महामानवाला अभिवादन



**धाराशिव** :- के.टी. पाटील औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल जोशी यांच्या हस्ते डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी प्राचार्य डॉ. जोशी यांनी आपल्या भाषणात सांगितले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय न्यायशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, राजकारणी, तत्त्वज्ञ आणि महान समाजसुधारक होते. त्यांनी दलित बौद्ध चळवळीला प्रेरणा देत सामाजिक भेदभावाविरुद्ध लढा उभारला. तसेच महिलांच्या आणि कामगारांच्या हक्कांसाठी त्यांनी मोलाचे कार्य केले. ते ब्रिटिश भारताचे मजूरमंत्री, स्वतंत्र भारताचे पहिले कायदेमंत्री, भारतीय संविधानाचे शिल्पकार आणि बौद्ध धर्माचे पुनरुज्जीवक होते. देशाच्या विविध क्षेत्रातील त्यांच्या महान योगदानामुळे त्यांना आधुनिक भारताचे शिल्पकार म्हणूनही ओळखले जाते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रासेयोचे कार्यक्रम अधिकारी प्रा. अतुलकुमार अलकुंटे, उपकार्यक्रम अधिकारी प्रा. शिवरत्न खरे, प्रा. पल्लवी हंगरगेकर, स्वयंसेवक तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अल निनोच्या सावटाखाली यंदाचा मान्सून; महाराष्ट्रात मात्र सरासरी गाठण्याचा अंदाज

## पाण्याचे योग्य नियोजन करण्याची गरज

**आरंभ मराठी । धाराशिव**

भारतीय हवामान विभागाने 13 एप्रिल रोजी 2026 च्या मान्सूनबाबतचा अधिकृत अंदाज जाहीर केला असून, त्यामध्ये यंदाच्या पावसाळ्यावर अल निनो चा प्रभाव राहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. यापूर्वीच स्कायमेट या खासगी हवामान संस्थेनेही अशाच प्रकारचा अंदाज व्यक्त केला होता. दोन्ही संस्थांच्या अंदाजानुसार, अल निनोमुळे देशातील काही भागांत पावसाचे प्रमाण कमी राहू शकते. मात्र महाराष्ट्र राज्यात सरासरी इतका किंवा सरासरीपेक्षा किंचित अधिक पाऊस पडेल, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. विशेषतः धाराशिव, लातूर, सोलापूर आणि पुणे जिल्ह्याच्या काही भागांत पावसाचे प्रमाण सरासरी एवढे राहील असा अंदाज आहे. तथापि, हवामानतज्ज्ञांनी काही भागांत सरासरीपेक्षा कमी पावसाची शक्यता वर्तविल्यामुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. आधीच तीव्र उष्णतेचा सामना करत असलेल्या शेतकऱ्यांना आता संभाव्य दुष्काळाचे सावट अधिक गडद वाटू लागले आहे. सध्या राज्यात उन्हाचा प्रचंड तडाखा असून विहिरी, बोअरवेल आणि इतर जलसाठ्यांची पातळी दिवसेंदिवस घटत चालली आहे. परिणामी पिण्याच्या पाण्यासोबतच जनावरांसाठी चारा व पाण्याची टंचाई जाणवू लागली आहे. याचा थेट परिणाम शेती व्यवसायावर होण्याची भीती व्यक्त होत आहे. यंदाच्या खरीप हंगामाबाबतही अनिश्चितता वाढली असून शेतकरी पेरणीच्या निर्णयाबाबत संभ्रमात आहेत. पावसाचा अंदाज कमी असल्याने बियाणे व खतांवर खर्च करूनही अपेक्षित उत्पादन मिळेल की नाही, याबाबत शेतकऱ्यांमध्ये संभ्रम आणि भीती निर्माण झाली आहे. एकंदरीत, सध्याच्या तीव्र उष्णतेच्या पार्श्वभूमीवर आणि अल निनोच्या प्रभावाखालील मान्सूनच्या अंदाजामुळे ग्रामीण भागात दुष्काळाचे सावट गडद होत असून, शेतकऱ्यांची चिंता दिवसेंदिवस वाढत आहे. मे महिन्यात येणाऱ्या मान्सूनच्या सुधारित अंदाजावर अनेकांचे लक्ष असून, त्या अंदाजातूनच खऱ्या अर्थाने मान्सूनची स्थिती कशी राहिल हे समजणार आहे. तरीही सध्या उपलब्ध असलेल्या पाण्याचा जपून वापर करावा असे आवाहन करण्यात येत आहे. मात्र, हवामान अभ्यासकांनी धाराशिव जिल्ह्यात यंदा सरासरीएवढा पाऊस पडणार असल्याचा दावा केला आहे. हवामान विभाग केवळ जून ते सप्टेंबर या चार महिन्यातील पावसाचा अंदाज देते. मात्र मागील काही वर्षांपासून धाराशिव जिल्ह्यात ऑक्टोबर महिन्यात देखील चांगला पाऊस पडतो. त्यामुळे पावसाची सरासरी यंदा भरून निघेल असा अंदाज व्यक्त केला जात आहे. मागील वर्षी जिल्ह्यात सरासरीच्या 162 टक्के पाऊस पडल्यामुळे जलाशयात अजूनही 40 ते 45 टक्के पाणीसाठा शिल्लक असल्यामुळे या उन्हाळ्यात पाण्याची समस्या जाणवणार नाही. मात्र, भविष्याचा विचार करून पाण्याचे नियोजन करणे आवश्यक आहे.



### घाबरू नका, यंदा सरासरीएवढा पाऊस पडणार

भारतीय हवामान विभागाने मान्सून संदर्भात पहिला अंदाज जाहीर केला आहे. त्यानुसार महाराष्ट्रात सरासरीच्या 92 ते 94 टक्के पावसाची शक्यता सांगितली आहे. शेतकरी बांधवांनी घाबरून न जाता हे सविस्तर समजून घेणे गरजेचे आहे. सरासरीच्या 92 टक्के पाऊस म्हणजे आपल्या भागातील किती मिलिमीटर पाऊस कमी होईल हे आपण स्वतः जाणून घेणे गरजेचे आहे. जूनमध्ये पाऊस सरासरी गाठेल किंवा थोडासा अधिक होईल. जुलैमध्ये तो सरासरीच्या जेमतेम कमी असेल. मात्र सरासरीचापर्यंत तो पोहोचेल. 15 ऑगस्ट ते 15 सप्टेंबर या कालावधीमध्ये थोडा खंड पडू शकतो. शेतकरी बांधवांनी या कालावधीत एक ते दोन पाण्याची सोय केल्यास आपल्याला दुष्काळ जाणवणार नाही. भारतीय हवामानशास्त्र विभाग हा फक्त जून ते सप्टेंबर या कालावधीमधील पाऊस मोजतो. मात्र आपल्याकडे ऑक्टोबर महिन्यात मोठा पाऊस पडतो. त्याचा आपल्याला फायदा होईल. या सर्व कारणामुळे शेतकरी बांधवांनी घाबरून न जाता काळजीपूर्वक पिकांचे व पाण्याचे योग्य नियोजन करणे गरजेचे आहे.

**सुरज जयपाल जाधव**
हवामान अभ्यासक, रुईभर.

## उमरग्यात वीरशैव कक्कय्या महाराज जयंती उत्साहात: भव्य मिरवणुकीने शहर दुमदुमले



**आरंभ मराठी । उमरगा**

बाराव्या शतकातील थोर शिवशरण आणि क्रांतीकारक वीरशैव कक्कय्या महाराज यांची जयंती उमरगा शहरात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्त शहरातून काढण्यात आलेल्या भव्य मिरवणुकीने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. ढोल-ताशांच्या गजरात आणि लेझीम पथकांच्या शिस्तबद्ध सादरीकरणामुळे संपूर्ण शहर भक्तीमय वातावरणात न्हाऊन निघाले होते. मिरवणुकीची सुरुवात शहरातील गौतम नगर येथील चौकातून करण्यात आली. यावेळी कक्कय्या महाराजांच्या प्रतिमेचे पूजन मा. आमदार ज्ञानराज चौगुले, नगराध्यक्ष किरण गायकवाड, सभापती ॲड. आकांक्षा चौगुले, दत्ता कटकधोंड, जितेंद्र चौगुले, संदीप चौगुले आदी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. मिरवणुकीत सहभागी झालेल्या लेझीम पथकांनी सादर केलेल्या विविध कलाकृती आणि ढोल पथकाच्या कडकडाटामुळे वातावरणात उत्साहाची भर पडली. या मिरवणुकीमुळे उमरगा शहरात सणासुदीचे वातावरण निर्माण झाले होते. तालुकाध्यक्ष संदीप चौगुले यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आलेल्या या मिरवणुकीच्या यशस्वितेसाठी अंबादास सोनकावडे, ज्योतिर्लिंग सोनकावडे, सुरज कटके, लक्ष्मण खरटमोल, केतन कटके, सटवाजी चौगुले, शरद कटके, संतोष कटके, प्रशांत सोनकवडे, जयदीप सोनकवडे, पारपा कटके, कृष्णा कटके, राहुल कटके, सचीन कटके, बालाजी कटके, बालाजी चौगुले, खंडू कटके, सचीन चौगुले, महादू चौगुले, बालाजी चौगुले, मनोज कावळे, विठ्ठल कावळे, विजय कटके, मनोज जाधव आदींनी परिश्रम घेतले.

## डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शासकीय योजनांचा माहिती मेळाव्याचे उद्घाटन

**आरंभ मराठी । धाराशिव**



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित 'महामानवाचा महाजयंती महोत्सव' अंतर्गत शासकीय योजनांचा माहिती मेळावा, दिव्यांग बांधवांसाठी विशेष मेळावा तसेच आरोग्य शिबिराचे आयोजन फुले शाहू आंबेडकर उद्यान कृती समितीच्या वतीने करण्यात आले होते. या उपक्रमाचे उद्घाटन जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांच्या हस्ते पार पडले. यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. प्रियंवदा महाडदाळकर, अधिष्ठाता डॉ. शैलेंद्र चौहान, तहसिलदार मृणाल जाधव, नायब तहसिलदार महादेव शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करण्यात आले. तसेच गौतम बुद्ध यांच्या मूर्तीला अभिवादन करण्यात आले. या मेळाव्यात नगर परिषद, तहसिल कार्यालय, दिव्यांग सक्षमीकरण विभाग, बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, कृषी विभाग, रोहिदास विकास महामंडळ, पंचायत समिती, एसटी महामंडळ, विधी सेवा प्राधिकरण आदी विविध शासकीय विभागांनी सहभाग नोंदवला. दिव्यांग बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विविध योजनांची माहिती घेतली. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांचा समितीच्या वतीने शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. धाराशिव सेवक म्हणून कार्य करणारे विवेक यादव व विजय राठोड यांचा विशेष सत्कार जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या हस्ते करण्यात आला. या वेळी विविध सामाजिक व शासकीय क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन फुले, शाहू, आंबेडकर उद्यान कृती समितीचे अध्यक्ष गणेश वाघमारे, सचिव प्रविण जगताप व इतर पदाधिकाऱ्यांनी केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम, रक्तदान शिबिर, भोजनदान तसेच विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

## माडज येथे डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**माडज** :- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त माडज येथे मराठा सेवा संघ, जिजाऊ ब्रिगेड व संभाजी ब्रिगेड यांच्या वतीने अभिवादन करण्यात आले. यावेळी बाबासाहेबांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांच्या विचारांना उजाळा देण्यात आला. शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा, तसेच शिक्षण हे वाघिणीचं दूध आहे या विचारांचा संदेश देत संघटनांच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत उपक्रम राबविण्यात आला. सलग चौथ्या वर्षी गरजू व होतकरू



विद्यार्थ्यांना दत्तक घेऊन त्यांना वर्षभरासाठी शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. आई-वडील नसलेले किंवा प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेणाऱ्या, परंतु गुणवंत विद्यार्थ्यांची निवड करून त्यांना मदत करण्यात आली. आर्यन महादेव भालेराव, धनश्री खजुरे, प्राची साळुंखे, प्रणाली साळुंखे, धनश्री पेठ सांगवी यांच्यासह एकूण दहा विद्यार्थ्यांना शालेय साहित्य देण्यात आले. बाबासाहेबांचे विचार केवळ घोषणांमध्ये न ठेवता आचरणात उतरविणे आवश्यक आहे. मुलांच्या हातात लेखणी आणि वही देऊन त्यांचे शिक्षण भक्कम करणे हीच खरी त्यांना अभिवादनाची भावना आहे, असे यावेळी वक्त्यांनी सांगितले. यावेळी मराठा सेवा संघाचे बाळासाहेब माने, शांतकुमार मोरे, दिलीप पवार, दिनेश पाटील तसेच जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्ष रेखाताई पवार, साधना पवार, सुवर्णा पवार, लता भोसले, रेखाताई साळवे, चमाबाई हराळे, भाग्यश्री रणदिवे, पूजा सूर्यवंशी, मयुरी पैलवान आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## तेर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जयंतीनिमित्त विविध ठिकाणी अभिवादन

**तेर** :- महामानव आणि भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त धाराशिव तालुक्यातील तेर येथे विविध ठिकाणी त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी ग्रामपंचायत कार्यालय, शासकीय ग्रामीण रुग्णालय तसेच इतर शासकीय कार्यालयांमध्ये त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. ग्रामपंचायत कार्यालयात उपसरपंच श्रीमंत फंड, ग्रामपंचायत अधिकारी बाबासाहेब खोचरे, ग्रामपंचायत सदस्य बापू नाईकवाडी, अमोल कसबे, नामदेव कांबळे, अभिमान रसाळ, लखन रसाळ, सुनील कांबळे, कानीफनाथ देवकुळे, बाळासाहेब रसाळ, प्रदीप कचरे यांच्यासह समाजबांधवांनी डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले. तसेच शासकीय ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधीक्षक डॉ. गुरूबास शेटे, डॉ. संगमेश्वर घोंगडे, स्वप्नील माने, बोंदर यांनी महामानवाला अभिवादन केले.

दैनिक आरंभ मराठी

### १६ जिल्ह्यांतील ७५० विद्यार्थ्यांचा सहभाग

# सलग 14 तास अभ्यासातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन

**आरंभ मराठी । धाराशिव**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त श्री साई श्रद्धा सेवाभावी संस्थेच्या वतीने यंदा एक वेगळा आणि प्रेरणादायी उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांनी दिवसभरात तब्बल १४ तास अभ्यास करून महामानवाला अभिवादन केले. या उपक्रमात राज्यातील १६ जिल्ह्यांमधील सुमारे ७५० विद्यार्थी, शिक्षक आणि अभ्यासकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. डॉ. आंबेडकरांनी शिक्षणाला सर्वोच्च स्थान दिले. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेऊन त्यांनी जागतिक पातळीवर उच्च पदव्या मिळवल्या. समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांवर आधारित त्यांचा विचार आजही प्रेरणादायी आहे. त्यांच्या या विचारांना कृतीत उतरवत विद्यार्थ्यांनी १४ तास सातत्याने अभ्यास करून खरी आदरांजली अर्पण केली. धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, अमरावती, नंदुरबार, धुळे, ठाणे, पुणे, नाशिक आदी जिल्ह्यांसह एकूण १६ जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग घेतला. नीट,



सीईटी आणि विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसह शिक्षक आणि शिक्षणप्रेमी नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदवला.



आजच्या डिजिटल युगात विचलित करणाऱ्या अनेक गोष्टींमध्ये १४ तास अभ्यास करणे हे मोठे आव्हान आहे. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, सातत्य, एकाग्रता आणि आत्मनियंत्रण या गुणांचा विकास व्हावा, हा मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले. या उपक्रमाचे हे दुसरे वर्ष असून, गेल्या वर्षी सुमारे ६०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यंदा हा आकडा ७५० पर्यंत पोहोचल्याने शिक्षणाच्या माध्यमातून परिवर्तन घडवण्याची जाणीव अधिक दृढ होत असल्याचे दिसून येते. या उपक्रमाबाबत प्रा. सोमनाथ लांडगे (संचालक, श्री साई श्रद्धा एज्युकेशन) म्हणाले, डॉ. आंबेडकर हे खरे 'अजन्म विद्यार्थी' होते. त्यांनी अथक परिश्रमातून शिक्षण घेतले. विद्यार्थ्यांनी त्यांचा आदर्श घेऊन सातत्यपूर्ण अभ्यास करावा, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. या अभिनव उपक्रमाचे समाजातील विविध स्तरांतून कौतुक होत आहे. प्रा. सोमनाथ लांडगे, उषाताई लांडगे, नागेश गोटे, देविदास बिनवडे, ऋषिकेश लांडगे तसेच पालक व विद्यार्थ्यांच्या सहकार्यामुळे हा उपक्रम यशस्वी झाला.

# पुढच्या पिढ्या घडवणारे शिक्षक अशैक्षणिक कामांच्या जंजाळात; शिक्षण व्यवस्थेसमोर गंभीर प्रश्न

## अध्यापनापेक्षा कागदोपत्री कामांचा बोजा वाढला; राज्यातील शिक्षण गुणवत्तेवर परिणाम



अमोलसिंह चंदेल
शिराढोण

आरंभ मराठी विशेष






**शिराढोण :-** राज्यातील शालेय शिक्षण व्यवस्था सुधारण्यासाठी विविध योजना आणि उपक्रम राबविले जात असले तरी प्रत्यक्षात शिक्षकांवर वाढत चाललेला अशैक्षणिक कामांचा बोजा ही गंभीर समस्या बनली आहे. शिक्षकांचे मूळ कार्य अध्यापन असले तरी सध्या त्यांना विविध शासकीय, प्रशासकीय आणि तांत्रिक जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागत असल्याने वर्गातील शिक्षण प्रक्रियेवर त्याचा थेट परिणाम लक्षात घेणे गरजेचे आहे. पुढच्या पिढ्या घडवण्याचे काम शिक्षक करतात. मात्र त्यांनाच अध्यापन सोडून इतर कामांना जुंपले जात आहे, अशी भावना शिक्षणप्रेमी नागरिक व्यक्त करतात. शिक्षणाचा दर्जा उंचावण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे, त्यांनाच अशैक्षणिक कामांमध्ये व्यस्त केले जात असल्याने ही विसंगती अधिक पुढे येत आहे. राज्यात प्राथमिक व माध्यमिक स्तरावर लाखो शिक्षक कार्यरत आहेत. मात्र शाळांमध्ये स्वतंत्र लिपिक, डेटा ऑपरेटर किंवा सहाय्यक कर्मचाऱ्यांची कमतरता असल्यामुळे प्रशासकीय कामे शिक्षकांनाच करावी लागतात. परिणामी शिक्षकांचा मोठा वेळ कागदोपत्री कामांमध्ये खर्च होत आहे. अशैक्षणिक कामामुळे राज्यातील शिक्षकांचा केवळ ५० ते ६० टक्के वेळच प्रत्यक्ष अध्यापनासाठी उपलब्ध राहत असल्याचे मत पालक वर्गातून व्यक्त होत आहे. शिक्षकांवर टाकण्यात येणाऱ्या कामांचा विस्तार मोठा आहे. त्यामध्ये निवडणूक व मतदार यादी अद्ययावत करणे, जनगणना व विविध शासकीय सर्वेक्षणे, आधार व विद्यार्थ्यांची माहिती अद्ययावत ठेवणे, शालेय पोषण आहार व्यवस्थापन, शिष्यवृत्ती योजना अंमलबजावणी, तसेच विविध ऑनलाइन पोर्टल्सवर डेटा एंट्री व अहवाल सादर करणे यांचा समावेश आहे. अनेक वेळा या कामांसाठी तातडीचे आदेश दिले जात असल्याने नियोजित अध्यापनात अडथळे निर्माण होतात. ग्रामीण व जिल्हा परिषद शाळांमध्ये ही समस्या अधिक तीव्र आहे. शिक्षकांची संख्या मर्यादित असल्याने एका शिक्षकावर अनेक वर्गांची जबाबदारी असते. अशा परिस्थितीत जर अतिरिक्त कामे वाढली, तर शाळा नियमितपणे चालवणे कठीण होते. परिणामी विद्यार्थ्यांच्या मूलभूत शिक्षणावर, विशेषतः वाचन, लेखन आणि गणित कौशल्यांवर नकारात्मक परिणाम होत असल्याचे चित्र आहे. डिजिटल शिक्षण आणि ऑनलाइन प्रणाली लागू झाल्यानंतर शिक्षकांचे काम सुलभ होईल अशी अपेक्षा होती, मात्र प्रत्यक्षात विविध ॲप्स, पोर्टल्स आणि डेटा एंट्रीमुळे कामाचा ताण वाढला आहे. वारंवार माहिती अद्ययावत ठेवणे, तांत्रिक अडचणी सोडवणे आणि वेळेत अहवाल सादर करणे या प्रक्रियेमुळे शिक्षकांचा वेळ आणि ऊर्जा मोठ्या प्रमाणात खर्च होत आहे.

### मूळ प्रश्न प्रशासनातील कमतरता

प्रशासनातील मनुष्यबळाची कमतरता, वाढत्या योजनांची अंमलबजावणी आणि डिजिटल प्रणालींचा वाढता वापर यामुळे शिक्षकांवरच अवलंबून राहण्याची प्रवृत्ती वाढली आहे. एकंदरीत, महाराष्ट्रातील शिक्षणव्यवस्थेच्या गुणवत्तेचा प्रश्न हा केवळ अभ्यासक्रम किंवा पायाभूत सुविधांपुरता मर्यादित नसून शिक्षकांवरील वाढत्या अशैक्षणिक बोजाशीही थेट संबंधित आहे. शिक्षकांना त्यांच्या मूळ कार्यापासून दूर ठेवल्यास शिक्षणाचा दर्जा घसरण्याची शक्यता वाढते. त्यामुळे शिक्षकांना शिक्षक म्हणूनच काम करू देणे आणि त्यांच्यावरचा अशैक्षणिक बोजा कमी करणे ही केवळ गरज नसून भविष्यात सक्षम आणि गुणवत्तापूर्ण पिढी घडवण्यासाठी अत्यावश्यक बाब ठरत आहे.

### आरोग्यावरही विपरीत परिणाम

या परिस्थितीचा मानसिक आणि शारीरिक परिणामही शिक्षकांवर दिसून येतो. सततचा ताण, थकवा, अध्यापनातील उत्साह कमी होणे, तसेच संतुलन बिघडणे या समस्या पुढे येत आहेत. काही शिक्षकांमध्ये आरोग्याशी संबंधित तक्रारीही वाढत असल्याचे निदर्शनास येते. शिक्षक संघटनांनी याबाबत वेळोवेळी शासनाचे लक्ष वेधले असून अशैक्षणिक कामे कमी करण्याची मागणी सातत्याने केली जाते.

# उमरग्यात स्वामी विवेकानंद शाळेत विद्यार्थ्यांची पट पडताळणी

आरंभ मराठी । उमरगा

उमरगा शहरातील स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिर येथे शासनाच्या आदेशानुसार ११ एप्रिल २०२६ रोजी विद्यार्थ्यांची पट पडताळणी करण्यात आली. शासनाने नुकत्याच जारी केलेल्या निर्देशांनुसार राज्यभरातील सर्व शाळांमध्ये पट पडताळणी प्रक्रिया सुरू आहे. त्याचाच एक भाग म्हणून या शाळेत इयत्ता पहिली ते सातवीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांची पडताळणी प्रत्यक्ष वर्गावर जाऊन करण्यात आली. ही प्रक्रिया शिक्षण विस्तार अधिकारी संजय राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या वेळी शाळेच्या मुख्याध्यापिका सविता लोहार यांच्यासह गोपाळ आष्टे, दत्तात्रय कोकणे, व्यंकट वचने आणि इतर सर्व शिक्षक उपस्थित होते. विद्यार्थ्यांनीही मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

# कै. पांडुरंग नन्नवरे यांच्या स्मरणार्थ न.प. शाळा क्र. ३ येथे आरओ प्लांटचे लोकार्पण



आरंभ मराठी । तुळजापूर

महात्मा जोतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त माजी नगरसेवक कै. पांडुरंग (तात्या) नन्नवरे यांच्या स्मरणार्थ मा. नगरसेवक नारायन नन्नवरे यांच्या वतीने येथील न.प. शाळा क्र. ३ येथे ५०० लिटर प्रति तास क्षमतेच्या जलशुद्धीकरण (आरओ) यंत्राचे लोकार्पण करण्यात आले. नगराध्यक्ष विनोद (पिटू भैया) गंगणे यांच्या हस्ते या उपक्रमाचे उद्घाटन पार पडले. नन्नवरे परिवाराच्या वतीने यापूर्वीही शाळेसाठी दूरचित्रवाणी संच, शालेय साहित्य तसेच विद्यार्थ्यांना गणवेश वाटप यांसारखे विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले असून, या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना शुद्ध पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे.या प्रसंगी नगरसेविका मंजुषा देशमाने, शालेय शिक्षण सभापती नीता क्षीरसागर, पंडितराव जगदाळे, ॲड. अजिंक्य नारायण नन्नवरे, समर्थ पतसंस्थेचे व्हा. चेअरमन श्रीकांत भोजणे, संचालक शिवाजी गायकवाड, सचिव सज्जन जाधव, सचिन शिंदे, तानाजी फुलसुंदर, शरद म्हेत्रे, विशाल व्हटकर आदी उपस्थित होते. तसेच शाळेचे मुख्याध्यापक तुकाराम मोटे, शिक्षक अशोक शेंडगे, जालिंदर राऊत, दत्ता मेढे, शरद कोळगे, रणजित नाईकवाडे, वैशाली गोमारे, पुष्पा काळे, कल्पना व्हटकर, सतीश यादव यांच्यासह शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विश्वमंगल मराठी फाउंडेशनतर्फे वारकऱ्यांना लस्सीचे वाटप



आरंभ मराठी । तेर

**तेर :-** वारकरी सांप्रदायाचे महान संत गोरोबाकाका यांच्या ७१० व्या समाधी सोहळ्यानिमित्त विश्वमंगल मराठी फाउंडेशनच्या वतीने वारकऱ्यांना लस्सीचे वाटप करण्यात आले. सोमवारी (दि.१३) सुरू असलेल्या या समाधी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर संजय कडाप्पा इंगळे यांच्या पुढाकारातून भाविक वारकऱ्यांसाठी लस्सीचे वितरण करण्यात आले. या उपक्रमाला वारकऱ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी जिल्हा परिषदचे माजी सदस्य नवनाथ इंगळे, रचना कन्स्ट्रक्शन कंपनीचे दत्तात्रय मुळे, विजय पाटील (पुणे), माजी उपसरपंच भारत इंगळे, ग्रामपंचायत सदस्य बापू नाईकवाडी, अविनाश आगाशे, नामदेव कांबळे, विलास रसाळ, राहूल भोरे, सुरेश पौळ आदींची प्रमुख उपस्थिती होती.

# वाणेवाडीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची 135 वी जयंती उत्साहात साजरी



आरंभ मराठी । तेर

धाराशिव तालुक्यातील वाणेवाडी येथे राजरत्न बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक व संविधाननिर्मितीतील योगदानाची आठवण करून देत त्यांच्या विचारांचे अनुसरण करण्याचे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमाला वाणेवाडी विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन दिपक घेवारे, सामाजिक कार्यकर्ते भीष्माचार्य बारस्कर, वाणेवाडीचे पोलीस पाटील प्रदीप घेवारे, जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष अनिल सरवदे, विजय सरवदे, सुनील सरवदे, कृष्णा सरवदे आदी उपस्थित होते.

# आग लागून कापड दुकानाचे नुकसान
# आ.डॉ.सावंतांकडून ५ लाखांची मदत

आरंभ मराठी । धाराशिव



तेरखेडा येथील गोळे कलेक्शन या कापड दुकानाला सोमवारी (दि.१३) सायंकाळच्या सुमारास अचानक आग लागून मोठी दुर्घटना घडली. प्राथमिक माहितीनुसार शॉर्टसर्किटमुळे ही आग लागल्याचे सांगितले जात असून, या आगीत दुकानातील मोठ्या प्रमाणावर कापडसाठा व साहित्य जळून खाक झाले. या घटनेत दुकानदाराचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. आगीची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली व आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न केले. काही वेळातच आग विझवण्यात यश आले; मात्र तोपर्यंत मोठे नुकसान झाले होते. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. घटनेची माहिती मिळताच तेरखेडा जिल्हा परिषद गटाचे शिवसेनेचे सदस्य विकी चव्हाण यांनी घटनास्थळी भेट देऊन नुकसानीची पाहणी केली. त्यांनी तात्काळ आमदार डॉ तानाजीराव सावंत यांच्याशी संपर्क साधून संपूर्ण परिस्थितीची माहिती दिली. या दुर्घटनेची गांभीर्याने दखल घेत आमदार तानाजी सावंत यांनी तत्परता दाखवत, शासनाची मदत मिळेल तेव्हा मिळेल; मात्र आपण वैयक्तिक स्तरावर तात्काळ ५ लाख रुपयांची मदत देणार आहोत, असे जाहीर केले. त्यांच्या या निर्णयामुळे पीडित दुकानदाराला मोठा दिलासा मिळाला आहे. सावंत यांच्यामार्फत आज नुकसानग्रस्त कुटुंबाला मदत दिली जाणार आहे.

दैनिक आरंभ मराठी

## ४ महिन्यांपासून ग्राहकांना सिलेंडर नाही, तरी सिस्टममध्ये 'डिलिव्हरी पूर्ण'

# उमरगा तालुक्यात गॅस एजन्सीचा भोंगळ कारभार

आरंभ मराठी । नारंगवाडी



उमरगा तालुक्यातील नारंगवाडीची वाडी परिसरात जळकोट येथील शंकरराव भारत गॅस ग्रामीण वितरक यांच्या एजन्सीकडून सुरू असलेला भोंगळ आणि बेजबाबदार कारभार आता उघडपणे ग्राहकांच्या फसवणुकीत परिवर्तित झाल्याचे समोर आले आहे. चार-चार वेळा गॅस बुकिंग करूनही ग्राहकांना प्रत्यक्षात एकदाही गॅस टाकी मिळत नसताना, एजन्सीकडून मात्र सिस्टममध्ये डिलिव्हरी पूर्ण झाल्याचे दाखवले जात असल्याने संताप व्यक्त होत आहे.ग्राहक एजन्सीशी संपर्क साधतात तेव्हा जबाबदारी झटकण्यासाठी "ड्रायव्हरला फोन करा" असे सांगितले जाते. तर ड्रायव्हरकडून "टाक्या आमच्याकडे आहेत, पण लक्षात नाही" अशी बेफिकीर उत्तरे दिली जात असल्याचा आरोप आहे. विशेष म्हणजे हा प्रकार एक-दोन दिवसांचा नसून तब्बल चार महिन्यांपासून सुरू असल्याचे उघड झाले आहे. परिसरातील पार्वती पवार यांचे प्रकरण याचे ठळक उदाहरण आहे. त्यांच्या कडे ५ किलोची गॅस टाकी असून त्यांनी १० जानेवारी, २९ जानेवारी, २५ फेब्रुवारी आणि १३ मार्च अशा चार वेळा गॅस बुकिंग केले आहे. मात्र आजपर्यंत त्यांना एकदाही टाकी मिळालेली नाही. उलट २४ जानेवारी, १३ फेब्रुवारी, ४ मार्च आणि २ एप्रिल या तारखांना डिलिव्हरी झाल्याचे सिस्टममध्ये दाखवण्यात आले आहे. बुकिंग व डिलिव्हरीच्या तारखांचे ठोस पुरावे असतानाही एजन्सीकडून कोणतीही कार्यवाही होत नसल्याचा आरोप आहे. ग्रामीण भागातील अनेक ग्राहकांनी जानेवारीपासून सातत्याने बुकिंग केले असले तरी प्रत्यक्षात गॅस पुरवठा शून्य असल्याची परिस्थिती आहे. यामुळे मजुरी करून उदरनिर्वाह करणाऱ्या कुटुंबांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. गॅसअभावी स्वयंपाकाचा प्रश्न गंभीर बनला असून नागरिकांना पुन्हा चुलीवर अवलंबून राहावे लागत आहे. एजन्सीकडून फोन न उचलणे, चुकीची माहिती देणे, होम डिलिव्हरी टाळणे अशा प्रकारांमुळे मनमानी कारभार उघड झाला आहे. नारंगवाडीतील ग्राहकांना प्रत्यक्षात होम डिलिव्हरी देणे आवश्यक असताना गॅस गावातच उतरवून ग्राहकांना सुमारे दोन किलोमीटर डोक्यावर टाकी वाहून न्यावी लागत असल्याचीही तक्रार आहे. उमरगा तालुक्यात इतका गंभीर प्रकार चार महिन्यांपासून सुरू असताना प्रशासन गप्प का, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. प्रशासनाने तात्काळ हस्तक्षेप करून संबंधित एजन्सीची सखोल चौकशी करावी, दोषींवर कठोर कारवाई करावी आणि सर्व ग्राहकांना तातडीने गॅस पुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी केली आहे.

# छावा प्रतिष्ठानचा पहिला वर्धापन दिन उत्साहात साजरा

## संघटनेकडून दरमहा केलेल्या बचतीमधून सामाजिक कार्यास मदत

आरंभ मराठी । धाराशिव

धाराशिव तालुक्यातील आळणी गावाच्या सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक उन्नतीसाठी कार्यरत असलेल्या छावा प्रतिष्ठान, आळणी या अराजकीय संस्थेचा पहिला वर्धापन दिन रविवारी (दि.१२) मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. छावा प्रतिष्ठानची स्थापना दिनांक १२ एप्रिल २०२५ रोजी, हनुमान जयंतीच्या शुभमुहूर्तावर करण्यात आली होती. छत्रपती संभाजी महाराज यांच्या शौर्य, पराक्रम, स्वाभिमान, धर्मनिष्ठा आणि त्यागाच्या विचारांनी प्रेरित होऊन ही संस्था उभी राहिली आहे. समाजातील प्रत्येक घटकासाठी निस्वार्थ भावनेने काम करण्याचा ध्यास या संस्थेने घेतला आहे. सध्या संघटनेमध्ये ५० सदस्य असून प्रत्येक सदस्य दरमहा १०० रुपये बचत जमा करतो. या निधीतून विविध सामाजिक उपक्रम राबवले जातात, ही बाब विशेष उल्लेखनीय आहे. वर्षभरातील उल्लेखनीय अनेक कार्य आहेत. गेल्या एका वर्षात छावा प्रतिष्ठानने अनेक उपक्रम राबवत समाजात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. यामध्ये दहावीतील प्रथम क्रमांकाच्या विद्यार्थ्यांचा सत्कार, NEET परीक्षा उत्तीर्ण होऊन डॉक्टर होण्यासाठी पात्र ठरलेल्या १० विद्यार्थ्यांचा गौरव, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती, लोकमान्य टिळक पुण्यतिथी निमित्त शैक्षणिक साहित्य वाटप, शाळांना पाणी फिल्टर, साउंड सिस्टीम व क्रीडा साहित्य प्रदान, वृक्षारोपण व पर्यावरण संवर्धन उपक्रम, तरुणांसाठी व्यायामशाळा व व्हॉलीबॉल मैदान सुरू, दिवाळी निमित्त गरजूंसाठी फराळ किट वितरण, आषाढी एकादशीला भक्तांसाठी केळी वाटप, मतदान जनजागृती मोहिम राबविणे, अशा विविध उपक्रमांचा समावेश आहे. वर्धापन दिनानिमित्त गावात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. ह.भ.प. महादेव महाराज तांबे यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी वारकरी संप्रदायाची दिंडी, गावातील वारकरी, माळकरी, टाळकरी तसेच प्रतिष्ठानचे सर्व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## धाराशिवमध्ये ६२२ महिला उद्योजिकांची दमदार झेप, महिला सक्षमीकरणाच्या दिशेने जिल्ह्याची वाटचाल

आरंभ मराठी / धाराशिव

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमाच्या माध्यमातून धाराशिव जिल्ह्यातील महिलांनी उद्योग क्षेत्रात उल्लेखनीय भरारी घेत नवा इतिहास घडविला आहे. पारंपारिक चौकटीतून बाहेर पडत स्वावलंबनाचा आदर्श निर्माण करत १०९५ मंजूर प्रकल्पांपैकी तब्बल ६२२ प्रकल्प महिला उद्योजिकांनी साकारले असून, जिल्ह्यात 'नारीशक्ती'ची ठळक छाप उमटली आहे. राज्य शासनाच्या या महत्त्वाकांक्षी योजनेमुळे सुशिक्षित बेरोजगार महिला व युवकांना उद्योग उभारणीसाठी अर्थसहाय्य मिळत आहे. यामुळे महिलांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याची सुवर्णसंधी मिळत असून, त्या आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासोबतच कुटुंबाच्या उत्पन्नातही महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत. ग्रामीण व शहरी भागातील महिलांनी विविध उद्योगांत सक्रिय सहभाग नोंदविला

नांदुरीत शाळेचा सांस्कृतिक जल्लोष; स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांचे रंगतदार सादरीकरण

–

धाराशिव; तुळजापूर तालुक्यातील नांदुरी जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन व विविध गुणदर्शन

कार

अध

सर

नान

गाडे

उपा




सीएसआर अंतर्गत बालाजी अमाईन्सकडून तामलवाडी शाळेला रंगकाम

आरंभ मराठी / तामलवाडी

बालाजी अमाईन्स कंपनीच्या सीएसआर ( कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी ) उपक्रमांतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तामलवाडी येथील



त्साहात

बोलकी